REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 5 | FEBRUARY - 2019

# रारंगढांग: जिद्दीची एक साहस कथा

सुभाष जयसिंग कदम
मराठी विभाग , कर्मवीर भाउराव पाटील , महाविद्यालय, पंढरपुर.




रारंगढांग ही प्रभाकर पेंढारकर यांची मिलिटरीच्या जीवनावर आधारित कादंबरी. या कादंबरीतील कथा अशी विश्वनाथ मेहेंदळे हा मुंबई मधील युनायटेड कन्स्ट्रक्शन मधील नोकरी सोडून बॉर्डर रोड मध्ये इंजिनिअर म्हणून रस्ता बांधण्याच्या कामावर हजर होतो. जेव्हा त्याच्यावर मेजर बंबा रारंगढंगातील रस्ता बांधणीचे काम सोपवितात. तेव्हा तो पुन्हा सर्वे करतो आणि त्याच्या लक्षात येते की रारंगढांगात मधल्या भागातील तीस फूट आत जमीन ठिसूळ आहे. तेव्हा तिथे सिमेंटचे खांब उभारून छताला सिमेंटचे लायनिंग केले पाहिजे. पण यासाठी मेजर बंबा परवानगी देत नाहीत आणि तेथेच लँडस्लाईड घडल्यानंतर कोणतीही परवानगी न घेता जेव्हा विश्वनाथ त्याच्या पद्धतीने काम करतो तेव्हा त्याला नोकरीवरून काढले जाते. त्या प्रसंगी तो म्हणतो की, “मी जरी नोकरी सोडून परत जात असलो, तरी मी उभारलेली स्मारके सत्तेला व अधिकाराला सतत आठवण करून देत राहतील की आमचे बलिदान व्यर्थ गेलेले नाही."

कादंबरीचा नायक विश्वनाथ मेहेंदळे याचे काम, विचार पाहता माणूस जन्माला येतो आणि मरेपर्यंत जगतो म्हणजे नेमकं काय करतो.? जीवन जगण्याचा अर्थ काय? आणि अर्थपूर्ण जगण्याचा अर्थ काय? असे जगत असताना स्वतःची ओळख माणसाला झालेली असते काय? असेल तर काही मर्यादा असतात काय? आणि जर तसे असेल तर त्या ठिकाणी माणूस कार्यरत असतो त्या त्याच्या कार्यक्षेत्रामध्ये त्याने स्वतः मधील पूर्ण क्षमतेने , अर्थपूर्ण दिशेने, यशस्वीतेपर्यंत पोहोचण्याच्या पूर्ण प्रयत्न केला काय? खरे यश तरी कोणते? या प्रश्नाचा मागोवा घेता घेता कदाचित प्रभाकर पेंढारकर यांच्या लेखणीतून 'रारंगढांग' सारखी चिंतनात्मक कादंबरी साकार झाली असावी.

‘रारंगढांग’ या कादंबरीतील नायक विश्वनाथ हा कोकणातील आंबेरीसारख्या खेड्यात जन्मलेला. प्रथम स्वातंत्र्यसैनिक आणि नंतर शिक्षकी पेशा स्वीकारलेल्या स्वतःची स्वतंत्र विचारसरणी असलेल्या वडिलांचा मुलगा, की जो इंजिनिअरिंगच्या वर्गातील असामान्य विद्यार्थी आणि गोल्ड मेडलिस्ट आहे.

बॉर्डर रोड ऑर्गनायझेशन हिमालयात ज्या उंचीवर रस्ते बांधते आहे. एवढ्या उंचीवर जगात कुठेच रस्ते बांधले गेले नसतील. तेथे इंजिनिअर म्हणून विश्वनाथ हजर होतो आणि येथील टास्क फोर्सचे कमांडिंग ऑफिसर 'कर्नल राईट' यांना भेटतो. या प्रथम भेटीतच गुणग्राहक राईट त्याला काही सल्ला देतात की, काम करताय इथल्या निसर्गाबरोबरच इथल्या माणसांना ही समजावून घ्या. कारण इथला लहरी निसर्ग शिस्तीच्या नावाखाली आहे आणि पर्याय नाही म्हणून वरिष्ठांची मर्जी सांभाळणारी माणसं समजून घेतली तर काम करता येईल. हा प्रसंग आणि सुभेदार मेजर प्रताप सिंग यांच्या विषयी येणारी माहिती यांच्यामधून कादंबरीच्या सुरुवातीलाच कादंबरीचा कथाविषय लेखकाने सूचित केला आहे.

मनापर्यंत पोचला नाही तो त्याचा स्वभाव नाही, म्हणून तो अपयशी होतो त्याच्या सुधारणावादी आधुनिक दृष्टीची जिद्दीची एक सहज कथा आहे.

आदर्श आणि व्यवहार याकडे न पाहता काही कालावधीनंतर नंतर व्यवहारास प्राधान्य देऊन कार्य करू पाहणारे आपल्या अधिकारात काम करताना अधिकारी आर्मीचा असो सिव्हीलीन असो त्याची क्षमता, बुद्धिमत्ता, नैपुण्यता आणि कामाची शिस्त लक्षात घेऊन काम करून घेणारे आणि इतरांच्या कामाला न्याय देणारे कर्नल राईटच आर्मी हेडकॉटरसकडून यापूर्वीचे सर्वेचे आर्मी रिपोर्ट मागवून घेता येतील म्हणत असताना तुझे प्रोजेक्ट रिपोर्ट मेजर बंबाच्या करवी माझ्याकडे पाठवू असे विश्वास सांगतात आणि विश्वनाथकडून वेळेवर काम करत नसेल तर तुझ्याअधिकारात तू त्याची बदली करू शकतो अशी मेजर बबांना परवानगी देऊनही प्रामाणिकपणा, कामाची तळमळ आणि आपण करीत असलेल्या कामावरील श्रद्धेमुळे त्याच्यात निर्माण झालेली त्याच्या कामाबद्दलची, निर्मितीची जाणीव, त्यामुळे त्याच्यात निर्माण झालेली त्या कामावरील निष्ठा लक्षात घेऊन त्याची बदली ऑर्डर कॅन्सल करतात. पण "नाही मला असला धोका घ्यायचा नाही काल काढलेली ऑर्डर आज बदलायचं नाही." असे म्हणतो.!

या संपूर्ण वर्णनात आपल्या अधिकाराच्या संदर्भात सक्षम असलेली माणसे जशी कादंबरीकाराने रेखाटली आहेत, तशीच त्यांच्यामध्ये असलेली 'मी' ची प्रतिमा कुरवळणारी वृत्ती, किंवा टोकाच्या निर्णयाप्रसंगी 'मी' ची प्रखर जाणीव असते. ती नकळत लेखकाने सूचित केले आहे. त्यामुळे मेजर बंबानी शिस्तीच्या नावाखाली अधिकाराचे ओझे निर्माण केले आहे असे म्हणत असताना हे जोखड कर्नल राईटना तरी पूर्णता फेकून देता आले आहे असे म्हणणे कठीण आहे. मग नोकरीच्या आणि त्यांच्यावर अवलंबून असलेल्या कुटुंबाच्या काळजीने असेल परंतु त्यातुन कर्नल राईटही सुटू शकले नाहीत. याक्षणी प्रसंगवर्णनात आणि व्यक्तीरेखाटनास लेखकाने जो न्याय दिला आहे. त्या शैलीचे सामर्थ्य अनन्यसाधारण आहेत कारण संपूर्ण वर्णनात कथानकातील गांभीर्यच सांभाळले आहे. पण प्रत्यक्ष पात्रांमध्ये समोरासमोर कुठेच कटूतेचा प्रसंग निर्माण झाला नाही त्याची कितीही घुसमट होत असली तरी बुद्धिवादी माणसांमधील संघर्षाचा, हे चिंतनशील वर्णन आहे असेच म्हणता येईल.

तसेच मेजर दुर्गाप्रसाद, विश्वनाथच्या केसचा पूर्ण अभ्यास करतात त्यसाठी विश्वनाथला विश्वासात घेण्याचा प्रयत्न करतात. कर्नल राईट यांना म्हणतातही, "जी मी सांगतो काय झालं ते! जे कोणत्याही सरकारी कचेरीत घडतं तेच घडलं ते पेपर तू पाठविले आणि

अध्याप ते प्रोजेक्ट ऑफिसमध्ये आहेत. यावर कुणीच काही निर्णय अध्याप घेतलेला नाही खरं आहे ना? एवढा केसचा अभ्यास करूनही कर्नल बंबा यांच्यासमोर त्यांनी विश्वनाथचा वकील म्हणून ही बाजू मांडली का? म्हणजे बुद्धिबळाच्या पटावरील हा वजीर संरक्षणाची सर्व घरं अधिकारात असताना कादंबरीतील नायकाला न्याय देण्यासाठी आपली चाल चालला काय? तसेच विश्वनाथाचे यासंदर्भातील सर्व प्रयत्न समोर येऊनही कर्नल बादलनी न्याय देताना जो समतोलपणा दाखवला असे वरवर जरी वाटले तरी तेवढ्यावरून त्यांना आहे असे म्हणता येईल काय? असे प्रश्न उपस्थित करून वाचकाला विचारप्रवण करणारी अस्वस्थ करणारी ही कादंबरी आहे.

तेव्हा या संपूर्ण कथानकात स्पर्धेच्या जगातील माणसांचा लढा महत्त्वाचा? की न्याय कृतिशीलतेचा संघर्ष महत्त्वाचा.? याचे उत्तर लेखकाने वाचकावर सोपवले आहे. असा हा मानवी प्रवृत्तीचा उतरता चढता आलेख व यातच या कादंबरीचे यश सामावलेले आहे.

याशिवाय बेली ब्रिजचे बांधकाम करताना घडणारे निसर्गाचे भयावह दर्शन आणि गुरख्यापासून वरिष्ठ आधिकाऱ्यापर्यंत सर्वांचे जीव ओतून काम करणे. यातील थरार मैत्रीचे सौहार्दपूर्ण वातावरण तयार करणारा मिनू खांखार, शांताराणी आणि तिचा भाऊ रामा यांच्या या वर्णनातून येणारे उपेक्षितांच्या जीवनातील कारुण्य ड्रायव्हर हनुमंत गायकवाड यांस रारंगढांगातील रस्त्याचे आणि बेली ब्रिजचे काम पूर्ण होईपर्यंत नाकारलेली रजा आणि जेव्हा मंजूर होते. त्याचवेळी खिशात आईच पत्र व लग्न न झालेल्या पत्नीचा फोटो आणि त्याचा लँड स्लाईडखाली झालेला मृत्यू, त्याबरोबर उमाच्या रूपाने विश्वनाथच्या भावजीवनाचा एक हळुवार कप्पाही लेखकाने उलगडून दाखवला आहे. या सर्व उपकथानकांच्या वर्णनातून प्रसंगवर्णने तर अवर्णनीय झाली आहेत. पण कादंबरीचा परीघ कादंबरीच्या आशयाच्या केंद्रबिंदूला व्यापून राहिलेला आहे.

आधुनिक सुधारणावादी व प्रगतिशील जगात वावरणारी बुद्धीवादी माणूस नजरेसमोर ठेवून लिहिलेले या कथानकात प्रश्नांची सरबत्ती केलेली आहे. ती माणसाला अंतर्मुख होऊन विचार करण्यास लावणारी आहे. मानवी वर्तनाचा अर्थ शोधण्यास प्रवृत्त करणारी अशीच आहे.

या संपूर्ण कादंबरीतील व्यक्ती चित्रणाचा जिवंतपणा त्या त्या पात्रांचे अंतरंग, मानसिकता, बौद्धिकता, मिस्कीलपणा स्पष्टवक्तेपणा, सडेतोडपणा, परखडपणा, मुत्सद्दीपणा रेखाटण्यात कादंबरीकाराच्या लेखनीला आलेले यश गंभीर कथाविश्वाच्या पार्श्वभूमीवर नजरेत भरण्यासारखे आहे. मानवी प्रवृत्तीच्या विविध तऱ्हांचे ओळख करून देणारे आहे. त्या त्या प्रवृत्तीचे वैशिष्ट्यांचे रसिक वाचकाला रसपान घडणणारे आहे.

घटना प्रसंगांमध्ये असणारे कामाची शिस्त, कामाची जोखीम, कष्टाची परिसीमा, निसर्गाची विविध रूपे (पृ क्र.११७/१२२ ही सर्व वर्णने अशी काही चैतन्यमय झालेली आहेत, की हिवाळ्यातील बॉर्डर रोड आणि तेथील कामाची प्रत्यक्ष पद्धती प्रत्यक्ष घरबसल्या जागेवर पहावी.

कादंबरीवरील संवाद खरोखरच निवेदनाला लाजवेल इतक्या सहजतेने कथानकाला वेग देतात. त्यांची सौंदर्यही बुद्धीला सिमित करणारे आहे. येथील खटकेबाज संवाद म्हणजे नाट्यमय काव्य होय. (पृष्ठ क्रमांक १४,३९,४५,४६,१२४,१६१इ.)

स्वतःच्या कामाबद्दलची ओढ आणि स्वतःवरील जबाबदारीची जाणीव अजून निर्माण झाली नाही तर माणूस म्हणजे प्रत्येक खेपेला धक्का देऊन सुरू करायचं वहान होते.(पृष्ठ ४०) जिद्दीने स्वीकारलेली जबाबदारी माणसाला विलक्षण सामर्थ्य देते. 'अपघात' हा पुन्हा करण्याजोगा प्रयोग नाही' यांसारख्या सुभाषितवजा वाक्यांमध्ये असलेली आशयघणता आणि जीवनदृष्टी बुद्धीला वैचारिक वाद्य देऊन कृतिशीलता करणारे आहे.

मृत्यूची भिषणता स्पष्ट करताना, 'जब आदमी मर जाता है, तो उसका क्या रहता है !' या प्रश्नाचे कादंबरीची सुरुवात होते आणि नोकरीपेक्षा पटलेल्या मतांस प्राधान्य देणाऱ्या विश्वानाथच्या नोकरीतील मुक्तीने कादंबरीचा अखेर होतो. ते लक्षात घेता माणसाचे जगणे, अधिकार, वेगवेगळी बढतीची पदे म्हणजे नेमके काय? कारण शेवटी हाती काय लागते? मग महान कीर्तीचा सुगंध मागे दरवळत ठेवून माणसाला आपल्या पदावर काम करता येणार नाही का? किंवा पदावरून निवृत्त होता येणार नाही का? एवढ्या साध्या प्रश्नाचं उत्तरही कादंबरीकार असे सूचित करतो तेव्हा कादंबरीचा घाट सौंदर्यसंपन्न होतो.

संदर्भ टीपा :–

1) रारंगढांग, प्रभाकर पेंढारकरए मौज प्रका�ान मुंबई, आवृति, 1998.
2) मुलाटे वासुदेव 'ग्रामीण साहित्य चळवळ आणि आम्ही'– स्वरूपप्रका�ान औरंगाबाद–2005.
3) सुरवाडे मनोहर– 1980 नंतरची ग्रामीण कथा'–बळीवं�ा प्रका�ान नांदेड 2010 पृश्ठ. 75,237
4) जाधव रा.ग –मराठी वाङमय इतिहास (खंड सातवा भाग दोन) महाराश्ट्र परिशद पुणे –